RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष ६, अंक ४८] सोमवार, डिसेंबर १४, २०२०/अग्रहायण २३, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ६९

प्राधिकृत प्रकाशन

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

[महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये]

सूचना

क्रमांक कडोंमपा/नरवि/१५३८

शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२०८/२८८४/सीआर-१३९/०९/नवि-१२.—दिनांक ४ एप्रिल २०१२ द्वारे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सेक्टर क्रमांक ३ ते ७ ची विकास योजना शासन सारभूत स्वरूपाचे फेरबदल (E.P.) वगळून मंजूर केलेली असून सारभूत स्वरूपाचे फेरबदल (E.P.) शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस. १२१२/४५८/प्र.क्र. १४८/१२/नवि-१२, दिनांक ४ ऑगस्ट २०१६ नुसार शासनाने मंजूर केलेले आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास योजनेतील सेक्टर क्रमांक ४ मधील मौजे कचोरे येथील आरक्षण क्रमांक ५०५ 'बगीचा' (पार्क) (क्षेत्र १,७८,८०० चौ.मी.) या आरक्षणाचे क्षेत्रापैकी ८७,६६० चौ.मी. क्षेत्राकरिता आरक्षण क्रमांक ५०५अ 'महापालिका प्रशासकीय इमारत' असा फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये करावयाच्या फेरबदलाच्या कार्यवाहीस मा. सर्वसाधारण सभेने दिनांक ६ नोव्हेंबर २०२० रोजीचा ठराव क्रमांक १९ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.

त्यानुसार फेरबदलाचा तपशील दर्शविणारा भाग नकाशा व इतर तपशील महापालिकेच्या सहायक संचालक नगररचना यांच्या कार्यालयात तसेच महापालिकेच्या ' ड ' प्रभाग क्षेत्र कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी नागरिकांना पहाण्यासाठी उपलब्ध होईल.

त्याअर्थी, प्रस्तावित फेरबदलाबाबत ज्या नागरिकांना हरकती/सूचना द्यावयाच्या असतील त्यांनी लिखीत स्वरूपात ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागात सादर करण्यात यावीत. जेणेकरून सदर फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस सादर करण्यापूर्वी त्यावर विचार करण्यात येईल.

डॉ. विजय सूर्यवंशी,
आयुक्त.
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

ठिकाण : कल्याण,
दिनांक ९ डिसेंबर २०२०.

KALYAN-DOMBIVALI MUNICIPAL CORPORATION, KALYAN

[As per Section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966]

Notice

No. KDMC/TPD/1538

The Urban Development Department of Government of Maharashtra, *vide* Notification No.TPS. 1208/2884/CR-139/09/UD-12, dated 4th April, 2012 has Sanctioned the Development Plan for Sector No. 03 to 07 (Excluding E.P.) of Kalyan- Dombivali Municipal Corporation and sanctioned the Excluded Part of the Development Plan *vide* Notification No. TPS-1212/458/CR-148/12/UD-12, dated 4th August 2016.

And Whereas, in the said Development Plan, Reservation No. 505 'Garden' (Park) (Area 1,78,800 sq.mtr.), out of which 87,660 sq.mtr. area is proposed to be modified as Reservation No. 505A ' Municipal Administrative Building ', and Hon. General Body of Kalyan-Dombivali Municipal Corporation has passed the Resolution No. 19, dated 6th November 2020 to initiate the process of modification as per Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

In view of this the Part Plan showing the relevant Changes with the proposed modification is kept open for inspection of General Public at the office of Town Planning Department and 'D' Ward Office of Kalyan-Dombivali Municipal Corporation on all working days in working Hours.

Therefore, I hereby inform to citizens regarding suggestion/objection if any to the proposed modification should be communicated in writting to Asssistant Director Town Planning Department, Kalyan-Dombivli Municipal Corporation within 30 days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette,* so that suggestion/objection so received will be considered before submitting the proposal for sanction of the Government of Maharashtra.

Place: Kalyan,
Date : 9th December 2020.

Dr. VIJAY SURYAVANSHI,
Commissioner,
Kalyan-Dombivali Municipal Corporation.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.